# प्रेसनोट

दि. ०६/०६/२०२२

## लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस अंमलदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. २८३/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ५२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - शिरीष आप्पासाहेब कामठे, वय - ३६ वर्षे<br>पद - पोलीस शिपाई<br>नेमणूक - लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/- ( एक लाख पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ०४/०६/२०२२
सापळा दिनांक :- ०४/०६/२०२२
ठिकाण :- लोणीकंद पोलीस स्टेशन समोर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जागेवर दुसरी व्यक्ती करत असलेले अनाधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी १ लाख ५० हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जागेवर दुसरी व्यक्ती करत असलेले अनाधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी लोकसेवक शिरीष आप्पासाहेब कामठे यानी १ लाख ५० हजार रूपयाची लाच मागणी करून तडजोडीअंती १ लाख १० हजार रूपयांची मागणी करून त्यापैकी १० हजार रूपयांची लाच स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवकास अटक करून मा. विशेष न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००.
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.